# कार्यालय नगर परिषद वरोरा जि. चंद्रपूर
## ई-निविदा सुचना

क्रमांक /नपव/स्व.वि./ 155 /2026 दिनांक 13 / 05 / 2026

नगर परीषद वरोरा स्वच्छता विभागाकरीता खालील नमुद केलेल्या कामासाठी १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत प्राप्त निधीतून द्विलिफाफा पध्दतीने जाहीर ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासनाकडील सदर कामासाठी सक्षम नोदणीकृत संस्थेकडून निविदा मागवण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे तपशिल | अंदाजपत्रकीय किंमत | अनामत रक्कम | निविदा फार्म किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Door to Door collection of waste from households, commercial establishments, other places in segregated form and transportation of collected waste to SWM site. Transportation of collected waste from road sweeping and other sites to SWM site, transportation of dead animals to SWM site. | 11845743/- | 118457/- | 2000/- | १ वर्ष |

ई-निविदा प्रसिध्दीचा तपशिल

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दिनांक 13 /05 /2026 दुपारी 3 वाजता |
| ई- निविदा दाखल व स्विकृती दिनांक | दिनांक 13 /05 /2026 वेळ दुपारी 3 वाजेपासुन ते<br>दिनांक 21 /05 /2026 वेळ दुपारी 3 वाजेपावेतो |
| ई- निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक 22/ 05/2026 दुपारी 3 वाजता ( शक्य झाल्यास ) |

सदर कामाचे निविदा संगणकावर ई- निविदा व्दारे ऑनलाईन करण्यात येईल. सदर कामाची सविस्तर ई-निविदा सुचना, इतर अटी व शर्ती शुध्दीपत्रके http//mahatenders.gov.in या सकंतेस्थळावर उपलब्ध असून, वर दिलेल्या रकाण्यातील तपशिल प्रमाणे डाऊनलोड करुन भरता येईल. संबंधीत कामाचे अनामत रक्कम व प्रपत्र रक्कम Online Net banking च्या माध्यमातुन भरावी लागेल.

मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा

**1. कामाचे नाव** :- Door to Door collection of waste from households, commercial establishments, other places in segregated form and transportation of collected waste to SWM site. Transportation of collected waste from road sweeping and other sites to SWM site, transportation of dead animals to SWM site.

**कामाचे स्वरूप**

a. शहरातील सर्व निवासी, व्यावसायिक व संस्थात्मक भागातून दररोज कचरा संकलन करणे.
b. ओला , सुका व घातक कचरा वेगळा गोळा करणे.
c. मार्केट भागातील कचरा व रोड सफाई पासून निघालेला कचरा रोज संकलीत करून त्याची वाहतूक घनकचरा व्यवस्थापन केंद्र पर्यंत करणे.
d. कचरा वाहतूक करतांना कचरा रस्त्यावर सांडू नये याची काळजी घेणे.
e. संकलित कचरा निर्धारित वेळेत घनकचरा व्यवस्थापन केंद्र पर्यंत पोहोचवणे.
f. प्रत्येक वार्डसाठी निश्चित मार्ग (Route Plan ) व वेळापत्रक तयार करणे.
g. वाहने स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे.
h. वाहनांची नियमित देखभाल व दुरुस्ती करणे.
i. नगरपरिषदेला दैनिक/ साप्ताहिक अहवाल सादर करणे.
j. कंत्राट दाराकडील कर्मचारी यांना मास्क, हॅन्डग्लोव्ज, घमेला,फावडा, गमबूट, रेनकोट इत्यादी सुरक्षा साहित्य पुरवावे लागेल.
k. वाहन चालका कडे संबंधित वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती असणे बंधनकारक आहे.
l. शहरातील सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या यांची नियमित साफसफाई करणे.
m. वाहनांचे लॉगबुक तसेच काम केले बाबतचा अहवाल व इतर कामाचे लागबुक व अहवाल नियमित अद्यावत ठेवणे.

**2. वरील कामाचे निविदा करीता लिफाफा क्र.०१ मध्ये कंत्राटदाराच्या पात्रते विषयी खालील कागदपत्रे असणे बंधनकारक राहील.**

1. संस्था नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
2. GST नोंदणी प्रमाणपत्र असले बाबतचे कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
3. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन (EPF) व कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) यांचे कडील रजिस्ट्रेशन असणे बंधनकारक राहील.
4. EPF व ESIC रजिस्ट्रेशन अंतर्गत 6 महिने कालावधीचे (माहे ऑक्टोबर २०२५ ते माहे मार्च २०२६) EPF व ESIC चे चालान सादर करणे बंधनकारक राहील.

5. मागील ३ वर्षाचे ITR (सन २०२३-२४, सन २०२४-२५, सन २०२५-२६) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
6. पॅन कार्ड ची प्रत सादर करणे अनिवार्य राहील.
7. मागील तीन वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल रु. ५० लक्ष असणे बंधनकारक आहे.
8. शहरातील सर्व निवासी, व्यावसायिक व संस्थात्मक भागातून दररोज कचरा संकलन करणे कामाचा किंवा इतर अनुषंगिक कामाचा अनुभव प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
9. घरोघरचा कचरा संकलन करून वाहतूक करणे करिता फोर व्हील ऑटो टिप्पर , थ्री व्हील ऑटो टिप्पर व ट्रॅक्टर कंत्राटदाराकडे स्वतःचे मालकीचे किंवा संस्थेच्या मालकाच्या नावाने नोंद असलेले किंवा सदर वाहने भाडेतत्वावर घेतले असल्यास त्याचे भाडेपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
10. निविदा भरणाऱ्या संस्थेने निविदे मध्ये सादर केलेले कागदपत्रे बिनचूक आहेत याबाबत रक्कम रु.५००/- च्या मुद्रांक शुल्कावर प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.
11. निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे व शासनाच्या कोणत्याही विभागाचे काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याचे रक्कम रुपये ५००/- च्या मुद्रांकावर शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
12. नगर परिषदेचे सदस्य , पदाधिकारी व अधिकारी , कर्मचारी यांचेशी हित संबंध नसल्याचे र.रु.५००/- च्या मुद्रांकं शुल्कावर प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.
13. निविदा कालावधीमध्ये कंत्राट दारामार्फात कामे करतांना कोणत्याही प्रकारची दुखापत, अपघात, नुकसान किंवा जिवित हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. नगर पालिकेची जबाबदारी राहणार नाही. या बाबत रक्कम रुपये ५००/- च्या मुद्रांकावर हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा

**सर्वसाधारण अटी व शर्ती –**

1. निविदेतील अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http//mahatenders.gov.in वेबसाईटवर सविस्तर ई- निविदा सुचना पाहवयास मिळेल.
2. सदर निविदेची पुढील कार्यवाही व शुध्दीपत्रके वरील महाराष्ट्र शासनाच्या http//mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहील .
3. कोणतेही कारण न देता अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे याबाबत वेगळी कारणे दिली जाणार नाही.
4. नोंदणीकृत कंत्राटदारांनी अधिकृत डिएससी प्राप्त करुन घेवून महाराष्ट्र शासनाच्या http//mahatenders.gov.in वेबसाईटवर स्वतःनोंदणी करुन केवळ ई-निविदा पध्दतीनेच सादर करावे.
5. निविदेत नमुद केलेले दर सर्व करांसहीत असून नगरपालिका कुठलाही जादा चा दर अदा करणार नाही व त्याबाबत कोणताही दावा कंत्राटदार करणार नाही.
6. मंजूर निविदा धारकांस कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी विहीत अटी-शर्तीचा व नियमानुसार लागणारी मुद्रांक शुल्क भरुन करारनामा करणे बंधनकारक राहील.
7. वित्तीय बोली लिफाफ्या मध्ये भरणा करण्यात येणारे दर सर्व शासकीय व आवश्यक कराचा समावेश करुन अंदाजपत्रकीय दरावर टक्केवारी नुसार किंवा समकक्ष देण्यात यावे.
8. निधीची उपलब्धते नुसार देयक देण्यात येईल.
9. नामंजूर निविदाधाराकासोबत कोणताही पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.
10. निविदा स्विकारणे अथवा कोणतीही किंवा सर्वच निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी, वरोरा नगर परीषद यांचेकडे सुरक्षित आहे.
11. मजुरांना गणवेश, मास्क,गमबुट, तसेच इतर सुरक्षा साधणे व ओळखपत्रे पुरविणे निविदाधारकास बंधनकारक राहील. आपले अधिनस्त काम करणा-या मजुरांना / व इतर कर्मचा-यांना सुरक्षेच्या दृष्टीने लागणारे आवश्यक साहीत्य ( गणवेश, ओळख पत्र सुरक्षा उपकरणे इत्यादी ) पुरविण्याची जवाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच त्यांचा कामगार विमा काढण्याची सुध्दा कंत्राटदाराचा राहील सदर कामाकरीता कामगार व मजुरांना लागणारे सुरक्षा उपकरणे जसे सेफ्टी गॉगल, हॅन्डग्लोव्ज,मास्क, कॅप इत्यादी देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
12. कंत्राटदाराने नगर परिषदेचे ट्रॅक्टर वापरल्यास दरमहा र.रु.9000/- वाहन परतावा बिलातून कपात करण्यात येईल व आपणास ट्रॅक्टर चे मेंटेनन्स स्वता करणे बंधनकारक राहील.
13. किमान वेतन नुसार कामगारांचे वेतनाचे भुगतान करावे लागेल.कामगारांना किमान वेतनानुसार वेतन देणे अनिवार्य राहील तसेच मजुरांचा काढलेला EPF भरणा करुन त्याबाबचे चालान बिलासोबत जोडावी लागेल.
14. कचरा वाहतूक करतांना झाकुन करण्यात यावी अशाप्रकारे वाहतुक न आढळल्यास प्रती घटनेमागे 200/- रुपये दंड आकारण्यात येईल.
15. अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराचे निविदा धारकास PSD/APSD बाबत शासन निर्णय सा.ब.वि.क्र.सिएटी/2017/प्र.क्र.08/इमा-02,दिनांक 26/11/2018 तसेच बवि/2016/प्र.क्र.02 / इमा-2 दि. 12/04/2017 चे तरतूदी नूसार नियम लागु असतील.

16. कामाचा आदेश मिळाल्यापासुन नमुद केलेल्या दरामधुन शासन निर्णयाप्रमाणे जीएसटी, (लागु असल्यास) आवश्यक कर व इतर कपाती देयकातुन वजा करुनच उर्वरित भुगतान अदा करण्यात येईल.
17. प्रत्येक महिण्याला कामाचे अहवाल घेऊन प्रतिमाहा नगर परिषदेच्या आर्थिक परीस्थितीनुसार देयक अदा करण्यात येईल. प्रत्यक चालु देयकातुन सुरक्षा ठेव व इतर शासकीय कपात करण्यात येईल.
18. बील हिशोबातील नजरचुकीने जादा रक्कम अदा केली गेल्यास जादा रक्कम न.पा. कार्यालयात त्वरीत भरणा करावी लागेल, असे न केल्यास पुढील देयकातून ती वसुल करण्यात येईल.
19. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ च्या तरतुदी तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतुदी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.
20. शासकिय लेखा परीक्षणात आक्षेप निघाल्यास त्याची पुर्तता करणेची जबाबदारी अभिकार्त्याची राहील. लेखा परीक्षणात वसुली निघाल्यास न.पा. निर्देशानुसार त्वरीत रक्कम भरावी लागेल.. तसेच आक्षेपांच्या अनुपालनासाठी आपल्याशी संबंधीत बाबींची पुर्तता करावी लागेल.
21. लेखा परीक्षणात आक्षेपित रक्कम वसुलीचे प्रकरण आढळून आल्यास अनामत रकमेतुन कपात करुन उर्वरित रक्कम परत करण्यात येईल.
22. कपात करण्यात आलेली सुरक्षा ठेव शासकीय लेखापरीक्षण पूर्ण झालेनंतर अदा करण्यात येईल.
23. निधी अभावी कामे मधातुन सोडता येणार नाही तसे केल्यास आपणास Blacklist करण्यात येईल.
24. कामे करताना कंत्राटदाराच्या निष्काळजीमुळे कोणतेही जीवहाणी/ अपघात झाल्यास, होणा-या गंभीर परिणामास कंत्राटदार व्यक्तीशाः जवाबदार राहील.
25. सदर कामात नगर परिषद तर्फे कोणत्याही प्रकारचे साहीत्य अथवा मजुर पुरवठा करुण्यात येणार नाही.
26. सदर कामात बालमजूर वापरता येणार नाही.
27. निविदेतील काम काम कोणत्याही दिवशी बंद असल्यास कामाच्या किंमती एवढी रक्कम कपात करुन प्रति दिन रुपये 1000/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
28. कामा संबधात कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास नगर परिषद जे निर्णय घेतील तें मान्य करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील व न्यायालयात जाता येणार नाही.
29. आदेश प्राप्ती पासुन आदेशाप्रमाणे नमुद सर्व कामे मुदतीत पुर्ण करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
30. कोणतेही कारण न दर्शविता निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांचे कडे सुरक्षित आहे.
31. सदर कामाची निविदा १२ महिने कालावधी करीता करण्यात येत असली, तरी कामाचा कालावधी कमी-अधिक करण्याचा अधिकार नगर परिषद वरोरा यांना राहील.
32. सदर काम हे घनकचरा व्यवस्थापन कामाशी संबंधीत असल्याने घनकचरा संबंधी इतर कामांना सदर कामावरील मनुष्यबळ वापरण्याची मुभा नगर परिषदेस राहील.
33. कंत्राटदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास कामाचे कंत्राट रद्द करुन सदर काम अन्य कंत्राटदाराकडून करवुन घेतल्यास यावर होणारा जास्तीचा खर्च कंत्राटदाराचे अनामत रक्कम व सुरक्षा ठेवीतुन वसुल करण्यात येईल व ती कमी पडत असल्यास नगर परिषद नियमातील तरतुदी अंतर्गत कार्यवाही करुन कंत्राटदाराकडुन वसूल करण्यात येईल.

34. सदरचे काम नागरिकांचे आरोग्याशी निगडीत असल्याने कोणत्याही परिस्थीतीत मुख्य अधिकारी नगर परिषद वरोरा यांच्या पुर्व परवानगी शिवाय काम बंद करता येणार नाही व एकतर्फे कंत्राट सोडुन देता येणार नाही. कंत्राटदार संस्थेने मुदतपुर्व काम सोडल्यास कंत्राटदार संस्थेची अनामत रक्कम व सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल. जर काम बंद करायचे असल्यास किमान ३ महिने पूर्व सूचना द्यावी लागेल.

35. कामा दरम्यान कोणतीही जिवित अथवा वित्त हाणी व इतर कोणतेही इजा अथवा नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील, नगर पालिकेची जबाबदारी राहणार नाही. कंत्राट दाराने नियुक्त केलेल्या सर्व कामगारांना कामगार अपघात विमा पॉलिसी घेणे आवश्यक राहील व नगर परिषदेला सादर करण्याची जबाबदारी कंत्राट दाराची राहील. तसे न केल्यास कंत्राट दाराकडून Breach of condition आणि अशा अपघातास नुकसान भरपाई देणे झाल्यास त्यावेळी रक्कम कंत्राट दाराच्या बिलातून / सुरक्षा ठेवेतून कपात करण्याचा अधिकार नगर परिषदेला राहील.

36. सदर प्रकरणी कार्यवाही कंत्राट सुरु असतांना कोणत्याही स्तरावरील न्यायालयाने कामास स्थगिती दिल्यास अथवा बंद करण्याचे आदेश दिल्यास त्यानुसार कारवाई करणे कंत्राटदार/ संस्थेला बंधनकारक राहील. या करीता नगरपालिका जबाबदार राहणार नाही.

37. सदर कामाकरीता लागणरा इंधन पुरवठा न.प. तर्फे करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

38. कंत्राटदाराची मुदत संपल्यानंतर पुढील कंत्राटदार निश्चित होईपावेतो याच निविदा दराने कामे करणे बंधनकारक राहील.

39. निविदा रद्द झाल्यास याच मंजूर दराने दुस-या कंत्राटदारास काम देण्याचे अधिकार नगर परिषदेला राहील.

40. कामाचे देयकातुन 10% सुरक्षा राशी कपात करण्यात येईल.

41. प्रत्येक महिन्याचे देयक प्रदान करण्यापूर्वी ईपीएफ चे चालान सोबत ईसीआर ची मागील महिन्याची कॉपी सोबत जोडणे अनिवार्य राहील.

42. कंत्राट दार कडील काम करणारे कर्मचारी यांना किमान वेतन नुसार वेतन करणे कंत्राट दारास बंधनकारक राहील.याबाबत कोणताही न्यायालयीन वाद किंवा इतर वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राट दाराची राहील. यामध्ये नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.

43. कंत्राटदार संसथेकडून कराराचा भंग झाल्यास कामे इतर संस्थेमार्फत करण्यात येईल व येणारा खर्च तसेच सर्व नुकसान भरपाई प्रथम कंत्राटदार / संस्थेकडुन वसुल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा यांना राहील तसेच अनामत रक्कम व सुरक्षा ठेव जप्त करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा यांना राहील.

44. कंत्राटदार संस्था व नगर परिषद यांच्यात वाद उत्पन झाल्यास याबाबत चर्चा करुन मुख्याधिकारी जो निर्णय देईल तो कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

45. करारनाम्या नुसार कामे होत नसल्यास,खंड पडल्यास,अनियमीतता असल्यास कराराचे अटीचा भंग केल्यास कार्यवाही करुन करार संपुष्टात आणण्याचा अधिकार मुख्य अधिकारी नगर परिषद वरोरा यांना राहील.

46. प्रत्येक दिवसाचे कामाचे ठिकाणाचे जिओटॅग फोटो काढुन कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

47. वर्षाचे सर्व दिवस ( 365 दिवस ) काम सुरु ठेवणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

48. कचरा संकलन करतांना परिसरातील नागरिकांच्या / नगरसेवकांच्या स्वाक्ष-या घेणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

49. सदर चे कामे ही सकाळी 6 ते 7 दरम्यान चालु करणे तसेच स्वच्छता निरिक्षक व भाग मुकादम यांच्या सुचनेनुसार करणे बंधनकारक राहील.

50. कोणत्याही नगरसेवकाचा निविदेमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असता कामा नये. जर असा कोणताही हितसंबंध दिसुन आला तर, कंत्राट रद्दबातल असल्याचे समजण्यात येईल. नगरपरिषदेस उक्त कंत्राटाखाली केलेल्या कोणत्याही कामाच्या संबंधात रक्कम रोखण्याचा हक्क असेल.

मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा

Signature Not Verified

Digitally signed by VISHAL CHANDRAKANT KAMDI
Date: 2026.05.13 13:26:13 IST
Location: Maharashtra-MH